# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका
## आरोग्य विभाग (मुख्यालय)
## जाहिर सुचना क्र. ०६/२०२२-२३

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, आरोग्य विभाग (मुख्यालय) कार्यालयाकडून खाली नमुद केले कामासाठी जाहिर निविदा www.smkc.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करून निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजीत रक्कम रु. | बयाणा रक्कम रु. | कामाची मुदत | फॉर्म फि र.रु. |
|---|---|---|---|---|---|
| १. | आरोग्य विभागामार्फत पकडण्यात आलेल्या भटक्या जनावरांना वैरण उदा. हिरवे गवत, शाळू, उसाचे वाडे, शिवरी, व कडबा पुरवठा करणे. | ३००००० | ३००० | ३१ मार्च २०२३ | २५०/- |

१. निविदा फॉर्म मिळण्याचे व सादर करण्याचे ठिकाण आरोग्य विभाग मुख्यालय, सांगली

२. संपुर्ण निविदा प्रक्रिया म्हणजे अर्ज विक्री, सादरीकरण व स्विकृती आरोग्य विभाग मुख्यालय, सांगली व्दारे कार्यरत राहील.

३. निविदा संचाची विक्री महानगरपालिकेच्या शाळा नं १ समोरील इमारत पहिला मजला येथे आरोग्य विभाग मुख्यालय, सांगली येथे प्रसिध्दीच्या दिनांका पासून दि.२६/०९/२०२२ रोजी दुपारी ०४.०० वाजेपर्यंत उपलब्ध केली जातील व दि.२६/०९/२०२२ रोजी सायं. ०४.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील.

४. निविदा दि २७/०९/२०२२ रोजी सायं. ०४.०० वा. निविदा कमिटी समोर उघडण्यात येतील.

५. निविदा प्रक्रियेबाबत अधिक माहितीसाठी महानगरपालिकेच्या शाळा क्र.१ समोरील इमारत पहिला मजला आरोग्य विभाग मुख्यालय,सांगली येथे संपर्क साधावा.

६. या निविदा बाबतच्या शर्ती अटी आरोग्य विभाग मुख्यालय, सांगली येथे उपलब्ध आहेत.

७. कोणतेही एक टेंडर स्विकारणे अथवा कोणतेही कारण न दाखवता सर्व टेंडर नाकारणेचा अधिकार महानगरपालिकेने राखून ठेवला आहे.

सांगली
दि.:-१६/०९/२०२२

वैद्य.आरोग्याधिकारी
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका
आरोग्य विभाग मुख्यालय
जाहिर सुचना क्र. ०६/२०२२-२३
शर्ती व अटी

निविदा दोन लिफाफा पध्दतीने द्याव्यात.

अ. <u>लिफाफा क्र. १ यामध्ये खालील तांत्रिक कागदपत्रे आवश्यक आहेत.</u>

i) टेंडर बयाणा चलन.

ii) मुंबई दुकाने संस्था अधिनियम १९४८ अन्वये नमुना (ड) संस्था नोंदणी प्रमाणपत्र.

iii) GST नोंदणी प्रमाणपत्र.

iv) पॅन कार्ड

v) टेंडर शर्ती अटी मान्य असलेबाबत सदरचा फॉर्म स्वाक्षरीसह दाखल करणे बंधनकारक.

<u>ब. लिफाफा क्रं. २ यामध्ये फक्त निविदा दराचा लिफाफा.</u>

१. लिफाफा क्रं. १ प्रथम उघडणेत येईल त्यामध्ये किमान ३ पात्र पुरवठादार असतील तरच लिफाफा क्रं. २ (टेंडर दर) उघडण्यात येईल.

२. टेंडर फॉर्म दर देताना प्रति पेंडीचा दर सर्वकरासहित देणेचा आहे.

३. कामाची मुदत मंजुरीनंतर वर्क ऑर्डर तारखेपासून ३१ मार्च २०२३ पर्यंत राहिल.

४. कामगिरी वेळेत करणे बंधनकारक आहे.

५. वैरणीचा पुरवठा करताना मंजूर मक्तेदार यांनी वाहतुकीचा खर्च करण्याचा आहे.

६. निविदे सोबत १% बयाणा रक्कम युनियन बँक ऑफ इंडीया, सांगली येथे मनपा खाते क्र.४२४२०२०१०५०२७०८ मध्ये भरणेचा असून बँकेचे चलन लिफाफा क्र.१ मध्ये जोडणेचा आहे. किंवा बयाणा रक्कमेचा डी.डी. मा. आयुक्त सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका यांचे नांवे काढून त्याची प्रत टेक्निकल लिफाफा मध्ये जोडणेची आहे व मुळ चलन निविदा उघडतेवेळी समक्षात सादर करणेचे आहे.

७. बयाणा रक्कम न भरलेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही.

८. टेंडर दर हा सर्व करासह देणेचा आहे.

९. I) निविदाधारकाचे EPF कायद्यानुसार नोंदणी प्रमाणपत्र व तद्‌नुषंगिक पुढील सर्व कार्यवाही करणेबाबतची कागदपत्रे निविदेसोबत जोडणेची आहेत. (लागू असेल तेथे) Employee Provident Fund and Miscellaneous provisions act १९५२ (Act no. १९ of १९५२) अन्वये ज्या मक्तेदाराकडे २० पेक्षा जास्त कर्मचारी वर्ग आहे, त्यांना EPF नोंदणी प्रमाणपत्र आवश्यक आहे. २० पेक्षा कमी कर्मचारी वर्ग असलेल्या मक्तेदारांनी प्रति कर्मचारी त्यांच्या वेतनाच्या २५.३६% प्रमाणे EPF चलनाने मनपा निधीमध्ये जमा करणे आवश्यक आहे. ज्याकरीता सोबत जोडलेल्या नमुन्यामध्ये प्रतिज्ञापत्र स्टॅम्पवर सादर करणे आवश्यक आहे.

II) महाराष्ट्र शासन परिपत्र क्रं. GST/प्र.क्र.८१/कराधान-१ दि. १९ ऑगस्ट २०१७ यामधील नमुद मार्गदर्शक सुचनेनुसार GST ची अंमलबजावणी दि. ०१ जुलै २०१७ पासून सुरू केलेने GST अधिनियमानुसार कराची आकारणी होणार असल्याने त्याबाबत GST च्या करासहित करून निविदा दर भरणेचा आहे. तसेच GST बाबत शासनाकडून वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या निर्देशानुसार आवश्यक कार्यवाही मक्तेदारवर बंधनकारक राहील. ज्या मक्तेदाराकडे कोणत्याही कारणांमुळे GST प्रमाणपत्र नाही त्यांना देय होणाऱ्या GST कराची रक्कम त्यांच्या देयकातून नियमानुसार अनुज्ञेय दंडात्मक दरानुसार कपात केला जाईल. तसेच मक्तेदाराकडे EPF/GST नोंदणी प्रमाणपत्र उपलब्ध नाही ते मक्तेदार कोटेशन प्रक्रियेत सहभागी होऊ शकतात.

१०. टेंडर भरताना खाडाखोड केली असल्यास तेथे टेंडर भरणाऱ्याने स्वाक्षरी केली पाहिजे.

११. टेंडर मंजुरी नंतर मंजुर दराने कामगिरीची लेखी ऑर्डर ठेकेदारास देण्यात येईल.

१२. ज्यांचे नावे निविदा मंजूर होईल त्यांनी एकूण रकमेच्या ५% सुरक्षा अनामत रोखीने भरून स्वखर्चाने इकडील नमुन्यात लेखी करारपत्र करून देणेचे आहे.

१३. वरील प्रमाणे पुर्तता केली नाही तर बयाणा रक्कम जप्त करणेत येईल व महापालिकेस पुन्हा कराव्या लागणाऱ्या खटाटोपीमुळे जो प्रत्यक्ष ज्यादा खर्च होईल त्या नुकसानीच्या खर्चाची जबाबदारी ज्यांचे नावे टेंडर मंजुर होईल त्यांचे जाती इस्टेटीवर राहिल.

१४. ज्या टेंडरदाराचे टेंडर मंजुर झाले आहे त्यास कोणत्याही कारणास्तव टेंडर मागे घेता येणार नाही. अथवा परस्पर इतर व्यक्ती, संस्था, भागीदार यांना हस्तांतरीत करता येणार नाही.

१५. कोणतीही एक अथवा सर्व निविदा मंजूर अथवा नामंजुर करण्याचा अधिकार महापालिकेने राखून ठेवला आहे.

१६. तसेच शर्ती व अटीमध्ये बदल करण्याचा व वाढ करण्याचा व तसेच निविदा दाखल करणेस मुदतवाढ देणेचा अधिकार महापालिकेने राखून ठेवला आहे. टेंडर शर्ती अटीमधील सर्व बाबींची पुर्तता करू शकणाऱ्या आणि निविदामध्ये नमुद कामगिरी करू शकणाऱ्या निविदा धारकांनीच निविदा भरण्याच्या आहेत.

१७. मागणीप्रमाणे वेळेवर कामगिरी न केल्यास प्रतिदिन र.रु. १००/- मात्र इतका दंड आकारण्यात येईल. तसेच मक्तेदाराने कामगिरी न केलेस २ नंबरच्या निविदा धारकास कामाचा आदेश देण्यात येईल, आणि त्यामध्ये जो जादाचा खर्च येणार आहे तो मंजूर निविदाधारकाकडून वसुल करण्यात येईल.

वरील शर्ती/अटी आम्हांस मान्य आहेत.

निविदा धारकांची सही/शिक्का

मसुदा मान्यतेसाठी

वैद्यकीय आरोग्याधिकारी,
सां. मि. कु. महानगरपालिका